**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव** : **संतोष विनायक जुगदर**,
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
राहणार : आळंदी, जि.पुणे.

**शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.डी.एल. वाडेकर :**

दि.२३/०६/२०२४ रोजी मी आक्का ट्रॅव्हल्समधुन वाशी, उस्मानाबाद ते पुणे येथे येत होतो. रात्री १२.०० ते ०१.०० वाजताच्या दरम्यान मी झोपलो असताना अचानक धाडदिशी मोठा आवाज झाला. त्यामुळे मी जागा झालो. त्यावेळी लोकांचा गोंधळ चालु होता व लोक ट्रॅव्हल्समधुन खाली उतरत होते. त्यावेळी मी माझी लॅपटॉपची बॅग घेवुन पळत खाली उतरलो व मी बुट देखील घातला नाही.

२. त्यावेळी मी खाली उतरून पाहिले की, आमच्या ट्रॅव्हल्सच्या क्लीनर साईडला ठोकण्यात आले होते. मला असे वाटले की, आमच्या ट्रॅव्हल्सने पुढे असणा–या गाडीला ठोकुन परत ट्रॅव्हल्स पाठीमागे आली होती. त्यावेळी मी पाहिले की, क्लीनर साईडला बसलेला माणुस बेशुध्द अवस्थेत रोडवर पडला होता व त्याचे संपुर्ण अंगाला मार लागला होता. त्यावेळी सगळया काचा पडल्या होत्या. मला देखील थोडे खरचटले होते व काचा लागल्या होत्या. सदरची घटना ही नगर– सोलापुर हायवेवरील रूईछत्तीसी गावातील पेट्रोल पंपाजवळ झाली होती. त्यानंतर पोलीसांनी माझी चौकशी करून माझा जबाब देखील नोंदविला होता.

सरतपास पुर्ण.

**शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.एम.के. शेडाळे :**

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.11.11 13:23:24 +0530

३. हे म्हणणे खरे आहे की, नगर – सोलापुर रस्ता हा चौपदरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतात

की, घटना घडली त्यावेळी ते झोपेत होते. हे मला सांगता येणार नाही की, मी ज्या ट्रॅव्हल्समध्ये बसलो होतो ती ट्रॅव्हल्स रोडच्या डाव्या बाजुने चालली होती व उजव्या बाजुला अवजड वाहने होती. हे म्हणणे खरे आहे की, अपघात मी प्रत्यक्ष पाहिले नसल्याने अपघातात कोणाची चुकी आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडल्यानंतर मी पोलीसांकडे गेलो नव्हतो व पोलीस माझकडे आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा-या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे सरकारी वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.11.11 13:23:30 +0530

(एस.आर. शिंदे)

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.

दि.११/११/२०२५